# क्रांतिज्योती सावित्रीबाई लढल्या म्हणून आम्ही महिला घडलो!



आज भारतातील स्त्रिया जीवनाच्या सर्वच क्षेत्रांत आघाडीवर आहेत. स्त्रियांनी आपला अवकाश निर्माण केला आहे. स्त्रियांचे जगणे बदलवण्यात सिंहाचा वाटा असलेले सगळ्यात महत्त्वाचं व्यक्तिमत्व म्हणजे – अंधाराकडून प्रकाशाकडे नेणारी एक ज्योत आणि ती म्हणजे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले. समाजात स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्यासाठी स्त्रीमुक्ती आंदोलनात सर्वस्व वाहून घेणारे भारतीय इतिहासातले जोतीराव व सावित्रीबाई फुले हे पहिले दाम्पत्य. स्त्रीशिक्षणाच्या अग्रदूत आणि स्त्री स्वातंत्र्यांच्या प्रणेत्या सावित्रीबाई यांना सर्वप्रथम विनम्र अभिवादन!

## शैक्षणिक कार्याची सुरुवात



साऱ्या कर्मठ समाजाच्या विरोधाला न जुमानता विवाहानंतर सावित्रीबाईंनी शिक्षण घेतले आणि शिक्षक, मुख्याध्यापक बनून शिक्षण दिले. १ जानेवारी, इ.स. १८४८ रोजी भिडेवाड्यात जोतिराव आणि सावित्रीबाईंनी मुलींची शाळा काढली. केवळ चार वर्षांत १८ शाळा उघडल्या आणि यशस्वीपणे चालवल्या. या शाळा चालविण्यासाठी त्यांनी अविश्रान्त परिश्रम केले. पण त्या काळी शिक्षिकेचे काम करणे ही काही सोपी गोष्ट नव्हती.

*एकदा तर त्यांच्यावर फारच कठीण प्रसंग आला. शाळेत जाताना एका आडदांड इसमाने सावित्रीबाईंना धमकावले; मात्र आपल्या कार्यावरील निष्ठेने धैर्य दाखवत त्यांनी खाडकन दोन थपडा त्याच्या कानशिलात लगावल्या. सावित्रीबाईकडून प्रतिकार होईल ही अपेक्षाच त्याला नव्हती आणि तो गोंधळून पळून गेला.*

शाळेत येणाऱ्या मुलींनाही त्रास देण्यात येई. पण वेळोवेळी पालकांना भेटून त्यांची समजूत काढण्याचे काम सावित्रीबाई करीत. त्यामुळे मुलींची संख्या वाढू लागली. समाजाच्या तीव्र विरोधाच्या काळात उस्मान शेख यांनी फुले दांपत्याला आपल्या घरी आश्रय दिला, तर त्यांची बहिण फातिमा शेख यांनी सावित्रीबाई फुले यांच्यासोबत मुलींना शिकवले. फातिमा शेख या भारतातील पहिल्या मुस्लिम महिला शिक्षिका मानल्या जातात.

## थोर शिक्षणतज्ञ

सावित्रीबाईंनी केवळ शिक्षिकेचेच काम केले नाही, तर शाळेतल्या अनुभवातून आणि निरीक्षणातून त्यांनी अनेक शिक्षणशास्त्रविषयक निष्कर्ष काढले व ते अमलात आणले. शूद्र–अतिशूद्र मुलांच्या शैक्षणिक विकासासाठी त्याच समाजातील शिक्षक आवश्यक आहेत, असे त्यांचे मत होते. "हीन-दीन मुलांना मातेच्या ममतेने समजून घेणे गरजेचे आहे" हे ओळखून शूद्रातिशूद्रांच्या शाळेत अध्यापन स्वतःकडे घेतले. शिक्षकांच्या प्रशिक्षणाचे महत्त्व ओळखून सावित्रीबाई–ज्योतिबांनी नॉर्मल स्कूल सुरू केले—हे त्यांचे द्रष्टे शिक्षणतज्ञ असणे सिद्ध करते. आपल्या 'काव्यफुले' या काव्यसंग्रहात त्या म्हणतात – ***शुद्रांना सांगण्याजोगा शिक्षण मार्ग हा । शिक्षणाने मनुष्यत्व, पशुत्व हाटते पहा ॥***

माणूस बनण्यासाठी, स्वाभिमानाने जगण्यासाठी शिक्षण हा मूलभूत विचार सव्वाशे वर्षांपूर्वी त्यांनी मांडला.

## महिला सेवा मंडळ : स्त्री सक्षमीकरणाची सुरुवात

१८५२ मध्ये सावित्रीबाईंनी 'महिला सेवा मंडळ'ची स्थापना केली. मंडळाच्या बैठकीत स्त्रियांच्या समस्या व उपायांवर चर्चा होत असे. तसेच खादी सूतकताई व वस्त्रनिर्मितीद्वारे महिलांना स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण व उत्पन्नाची संधी मिळत असे. त्या काळात हळदीकुंकवाच्या निमंत्रण पत्रिकेवर त्यांनी लिहिले होते की कोणत्याही जातीच्या अगर

धर्माच्या बायका आल्या तरी त्या एकाच जाजमावर बसतील. सर्व जाति-धर्मांच्या स्त्रिया येथे सहभागी होत.

## महाराष्ट्रातले पहिले बालहत्या प्रतिबंधक गृह

जरठ-कुमारी विवाहप्रथेमुळे बारा-तेरा वर्षांच्या मुली विधवा होत आणि विधवा पुनर्विवाह नाकारल्यामुळे त्यांचा अमानुष छळ होत असे. समाजभीतीमुळे अनेक विधवा आत्महत्या किंवा भ्रूणहत्या करत. या अन्यायाला आळा घालण्यासाठी, विधवांना सुरक्षा व गुप्त बाळंतपणाची सुविधा देण्यासाठी फुले दाम्पत्याने २८ जानेवारी १८५३ रोजी 'बालहत्या प्रतिबंधक गृहा'ची स्थापना केली. त्या गृहातल्या मुलांची अविरतपणे वात्सल्याने सेवा करीत. पुढे याच ठिकाणी जन्मलेल्या काशीबाई या ब्राह्मण विधवेचे मूल त्यांनी दत्तक घेतले. त्याचे नाव यशवंत ठेवले.

## सत्यशोधक समाजाचे कार्य



महात्मा फुले यांच्या निधनानंतर सावित्रीबाईंनी सत्यशोधक समाजाच्या कार्याची धुरा वाहिली. १८९३ मध्ये सासवड येथे भरलेल्या सत्यशोधक समाज परिषदेचे नेतृत्व त्यांनी केले. त्यांनी अज्ञान, अंधश्रद्धा व अन्यायावर कठोर टीका करत विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार व शोषितांच्या हक्कांसाठी जनजागृती केली. पोटासाठी शरीरविक्रय करणाऱ्या बाया-बापड्यांना दुष्टांच्या तावडीतून सोडवून त्यांनी त्यांना सत्यशोधक कुटुंबांत आश्रयास पाठविले.

२५ डिसेंबर १८७३ रोजी सीताराम जबाजी आल्हाट नावाच्या तरुणाचा राधा नावाच्या तरुणीशी पहिला सत्यशोधक पद्धतीचा विवाह सावित्रीबाईंनी घडवून आणला. तसेच विधवा स्त्रियांच्या समस्या सोडवण्यासाठी त्यांनी पुनर्विवाह संस्था स्थापन करून नियमित सभांतून शिक्षण, छळ व हक्कांवर चर्चा केली. फुले दाम्पत्याने पुणे आणि आसपासच्या परिसरात एकूण **५२ मोफत अन्नछत्रे** सुरू केली होती.

## स्वतंत्र प्रज्ञेच्या कवयित्री सावित्रीबाई

*ज्ञान नाही विद्या नाही*
*ते घेणेची गोडी नाही*
*बुध्दी असुनि चालत नाही*
*तयास मानव म्हणावे का?*

१८५४ साली त्यांचा 'काव्यफुले' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. तेव्हा त्या फक्त २३ वर्षांच्या होत्या. त्यांचा 'बावन्नकशी सुबोध रत्नाकर' काव्यसंग्रह १८९२ साली प्रसिद्ध झाला. त्यांनी जोतिबांच्या भाषणांचं संपादन केले. 'मातोश्री सावित्रीबाईंचे भाषणे व गाणी' या नावाने पुस्तकही १८९१ मध्ये प्रसिद्ध करण्यात आले. जीवनाच्या वास्तव परिस्थितीवर, समानतेच्या वागणुकीची अपेक्षा व्यक्त करणाऱ्या कविता मराठी साहित्यात पहिल्यांदा सावित्रीबाईंनी लिहिल्या.

## प्लेगच्या काळात सावित्रीबाईंचे कार्य

१८९७ मध्ये पुणे परिसरात प्लेगने थैमान घातले असताना अनेकजण शहर सोडून गेले; मात्र सावित्रीबाई मागे हटल्या नाहीत. त्यांनी अस्पृश्य वस्त्यांमध्ये जाऊन रुग्णांची माहिती घेतली, घोरपडी येथे दवाखाना सुरू करून सत्यशोधक समाजाच्या कार्यकर्त्यांसह रुग्णांवर विनामूल्य उपचार केले. त्याच जीवघेण्या साथीत सेवा करत १० मार्च १८९७ रोजी त्यांनी प्राणत्याग केला. **सावित्रीबाई लढल्या म्हणून आम्ही महिला घडलो!** आजची गरज आहे—एकत्र येऊन सावित्रीबाईंनी दाखवलेल्या परिवर्तनाच्या दिशेने सर्वांना सोबत घेऊन पुढे जाण्याची. त्यांच्या लढ्याचा आणि विचारांचा वसा घेऊन आपण सातत्याने कार्यरत राहूया—हेच क्रांतिज्योती सावित्रीबाईंना खरे अभिवादन ठरेल!

## संविधान जागर अभियान

**संविधान जागर अभियान निमंत्रक समिती:** मा.न्या.बी.जी. कोळसे पाटील, मा.न्या.ए.एम. ठिपसे, मा.न्या. टी.व्ही. नलावडे, तुषार गांधी, डॉ. राम पुनियानी, डॉ. नितीन राऊत, धनाजी गुरव, नीरज जैन

स्वप्निल फुसे: 79723 45764 | नागार्जुन वाडेकर: 98602 39899 | राजाभाऊ करवाडे: 98222 02739

**samvidhan.jagar** **samvidhanjagar.org**